# ’कला’ ने सादर केला ’समीप रंगमंच’

**हेमांगी वाडेकर**

नाविन्य जोपासणारे,प्रयोगशील कार्यक्रम सादर करणाया "कॅलिफोर्निया आर्ट्स असोसिएशन" अर्थात "कला" ने बृहन महाराष्ट्र मंडळच्या शिकागो येथे भरलेल्या अधिवेशनमध्ये "समीप रंगमंच" हा कार्यक्रम सादर केला. नाटक प्रेक्षकांसमोर घडण्यापेक्षा प्रेक्षकांमध्ये घडावं, कलाकार आणि प्रेक्षक यांच्यामधील अदृश्य चौथी भिंत दूर व्हावी हा समीप रंगमंच चा उद्देश असतो. अर्थातच योग्य संहितांची निवड करणे, नेपथ्य आणि प्रकाशयोजनेचा जाणीवपूर्वक वापर करणे या गोष्टी प्रयोगाची परिणामकारकता वाढवण्यासाठी आवश्यक ठरतात.

शिकागोच्या अधिवेशनामध्ये "समीप रंगमंच" सदराखाली चार एकांकिका सादर झाल्या.

सुरुवात झाली "कला" च्या कलाकारांनी सादर केलेल्या जी ए कुलकर्णी यांच्या "स्वामी" या असामान्य कथेवर आधारीत एकांकिकेने. जी एं चं लेखन जीवनावर भाष्य करणारं असतं. कथानकामध्ये तरलपणे उलगडत जाणारे अनेक पदर व पैलू असतात."स्वामी" या कथेमध्ये एका सामन्य व्यक्तिला अकल्पितपणे मठाधीश बनवण्यात येतं. जबरदस्तीने तळघरातील एकांतवास त्याच्यावर लादण्यात येतो. त्या अंधाऱ्या कोठडीतली अगतिकता सतत प्रहार करत असतानाही त्याची अपराभूत आशा कशी सतत तेवती राहाते याचं वर्णन या कथेत येतं. या वर्णनांमधील चित्रमयता दृश्य स्वरूपात आणण्याचं आव्हान पेलताना दिग्दर्शक मनोज वाडेकर यांनी ’लाईट’ आणि ’लेव्हल’ चा अतिशय कलात्मक वापर केला होता.’निवेदिका’ झालेल्या हेमांगी वाडेकर व ’महंत’ म्हणून मुकुंद मराठे यांनी आवाजातील चढ उतारांच्या सहाय्याने आपापल्या भूमिकांत रंग भरले. प्रमुख भूमिकेत रोहीत पोतनीस यांनी चेहेयावरील बदल आणि लवचिक हालचालींनी एकांतवासात होणारी तडफड आणि मानसिक आंदोलने प्रभावीपणे दाखवली. या प्रयोगाचं वेगळेपण आणि मांडणी यांना जाणकार प्रेक्षकांची मन:पूर्वक दाद मिळाली."खूप अस्वस्थ केलं या नाटकानं..आता जी एंचं साहीत्य वाचणारच "किंवा "तळघरातली घुसमट अक्षरश: जाणवली" यांसारख्या प्रतिक्रियांनी प्रयोग यशस्वी झाल्याची ग्वाही दिली.

दुसऱ्या दिवशीच्या सत्राची सुरुवात इंडियानापोलीस च्या कलाकारांनी सादर केलेल्या "सॅट जोशी" या एकांकिकेने झाली. अमेरीकास्थित लेखक सुहास तांबे यांनी लिहिलेल्या या एकांकिकेचा विषय अर्थातच अधिवेशनाच्या प्रेक्षकांना भावणारा होता. घरापासून, आई-वडीलांपासून मानसिक फारकत घेतलेला "सॅट" म्हणजेच "सतीश" जोशी अनेक वर्षांपासून अमेरिकेत स्थायिक झालेला असतो. भारतातून एक वृद्ध आईवडील आपल्या "सतीश जोशी" नामक परागंदा मुलाला शोधत अमेरिकेत येऊन पोचतात. नावातील साम्यामुळे ते "सॅट" ला भेटायला येतात तेव्हा केवळ पत्नीच्या आग्रहाखातर तो त्यांना भेटतो पण ओळखत नाही.परकेपणाच दाखवत राहातो.पण नंतर त्याला "बोन मॅरो ट्रान्स्प्लान्ट" ची गरज पडते तेव्हा भारतातून आलेल्या पाहुण्यांचा "बोन मॅरो" नक्की जुळेल याची खात्री देऊन तो शेवटी त्यांच्या मधील नात्याचा हृदयस्पर्शी गौप्यस्फोट करतो! दिग्दर्शक नितीन गोखले यांनी समर्पक पात्रयोजना आणि कमीत कमी नेपथ्याचा वापर केला होता. प्रसाद पराडकर,सोनाली गोखले,शिरीष रानडे, अंजली लेले आणि संजय विंझे या सर्वच कलाकारांनी आपापल्या भूमिका समजून केल्या आणि नेटका प्रयोग सादर केल्याबद्दल प्रेक्षकांची दाद मिळवली.

त्यानंतर सादर झालेल्या "पाणी" या एकांकिकेचा बाज होता पूर्णपणे चर्चात्मक.ही कथा होती नर्मदा आंदोलनामध्ये काम केलेल्या दोन कार्यकर्यांची. एकमेकांचे घनिष्ट मित्र असलेल्या या दोघांची आंदोलनाकडे बघण्याची दृष्टी मात्र अगदी भिन्न असते. दोघांमधल्या वादाचं एकमेव कारण हेच असतं. धर्मकिर्ती सुमंत या तरुण लेखकाने आपल्या खास शैलीत जिवंत संवाद लिहिले आहेत. मनस्वी, निष्ठावान कार्यकर्त्याची भुमिका संजय पाचपांडे यांनी झरझर बदलणारे भाव आणि आवाजाचा योग्य वापर करत सुरेख रंगवली. बुद्धिप्रधान कार्यकर्त्याचा निर्धार,आत्मविश्वास आणि मनाचा समतोलपणा दाखवताना मनोज वाडेकर यांनी आवाज आणि  देहबोली चा प्रभावी वापर करून सकस अभिनयाची प्रचिती दिली.मुकुंद मराठे यांच्या समर्थ दिग्दर्शनाने अधिकच उठावदार झालेल्या या प्रयोगाला गच्च भरलेल्या प्रेक्षागृहाकडून भरभरून प्रतिसाद मिळाला. विषय अवघड आणि चर्चाप्रधान असूनही "पाणी" च्या कलाकारांनी प्रेक्षकांना गुंगवून ठेवलं आणि शेवटी रसिकांकडून "standing ovation" मिळवलं!

शेवटी झालेली "गप्पा" ही एकांकिका सिएटलच्या सुबोध आणि श्रद्धा देवधर-ओक यांनी सादर केली. योगेश सोमण यांच्या लेखणीतून उतरलेल्या खुसखुशीत संवादाना सुबोध आणि श्रद्धा यांनी खरोखर जिवंत केलं. पुण्याच्या बागेत बसून व्यायाम आणि भाजी निवडणे ही कामं उरकताना गप्पा मारणारे नवरा बायको हि या एकांकिकेतील पात्रं. विषय हलकाफुलका होता आणि त्यांच्या गप्पामध्ये वाक्या वाक्यात निर्माण झालेले विनोद होते. गप्पामधून घडणारं त्यांच्या मनातील बेतांचा फोलपणा आणि त्यांच्या मधल्या नात्याचं दर्शन याचा विलोभनीय आविष्कार या एकांकिकेतून साकार झाला. त्यांच्या अभिनयातील सहजता आणि लवचिकपणा केवळ वाखाणण्याजोगा होता. विनोदाच्या 'टायमिंग' च नेमकं भान राखल्यामुळे दर वाक्यागणिक प्रेक्षकांचे हशे आणि टाळ्यांचा प्रतिसाद मिळत होता आणि नाटक अधिकाधिक रंगत होतं! शेवटी प्रेक्षकांनी न थांबणारा टाळ्यांचा गजर आणि "standing ovation" देऊन  या "गप्पा" रंगल्याची मनमुराद पावती दिली.

वेगवेगळे विषय आणि वेगवेगळी मांडणी यामुळे या चारही एकांकिकांचे प्रयोग रंगले.अशा तऱ्हेच्या प्रयोगशील कार्यक्रमांनाही प्रेक्षकांचा उत्तम प्रतिसाद मिळतो याचं समाधान "समीप रंगमंच" च्या  अधिवेशनातील प्रयोगामुळे मिळालं आहे. "पुढील अधिवेशनातही समीप संगमंच चा कार्यक्रम हवाच" ही प्रतिक्रिया पुरेशी बोलकी आहे!

*****